# भारताच्या आर्थिक विकासात बॅंकिंग क्षेत्राचे महत्व

**प्रा. डॉ. गिन्हे एस.एस.**
अर्थशास्त्र विभाग,
मत्स्योदरी महाविद्यालय, तिर्थपुरी,
जि. जालना

**प्रस्तावना**

देशाच्या अर्थिक विकासात बॅंकिंगक्षेत्र अत्यंत महत्वपूर्ण स्वरुपाचे आहे. भारतात पाश्चात्य पध्दतीच्या बॅंकिंगची सुरवात ही एकोणिसाव्या शतकाच्या आरंभी झाली. ईस्ट इंडिया कंपनीच्या कर्मचा—यांनी सुरु केलेल्या त्यावेळच्या वाणिज्य अधिकोषांना ''एजन्सी हाउसेस'' असे म्हणत असत. पहिली संयुक्त भांडवली बॅंक ''बॅंक ऑफ हिंदूस्तान'' या नावाने कलकत्यात सुरु झाली. सन १९०५ मध्ये सुरु झालेल्या स्वदेशी चळवळीने भारतीय बॅंकांच्या स्थापनेला चालना मिळाली. सन १९२० मध्ये तीन प्रांतीय बॅंकांचे एकत्रीकरण करुन ''इंपिरिअल बॅंक'' निर्माण करण्यात आली. सन १९५५ पर्यंत तिचे स्थान फार महत्वपूर्ण होते. सन १९५५ मध्ये बॅंकांचे राष्टीयकरण करण्यात आले व स्टेट बॅंक ऑफ इंडियाची निर्मिती करण्यात आली. वाणिज्य कायदा करुन बॅंकेच्या व्यवहाराचे नियमन करण्याचे व्यापक अधिकारी आर. बी. आय. ला देण्यात आले.

**प्रमुख वाणिज्य बॅंक व राष्टीयकरण का ?**

१९ जुलै १९६९ या दिवशी भारत सरकारने एकखास वटहुकूम काढुन १४ प्रमुख बॅंकांचे राष्टीयकरण करण्यात आले. ज्या बॅंकाचे राष्टीयकरण करण्यात आले राष्टीयकरणाचा अधिकार सरकारला देण्यात आला. या कायदयाचा आधार घेवुन पुढे सन १९८० ला परत बॅंकाचे राष्टीयकरण करण्यात आले. यामुळे १. बॅंकावरील मुठभर उदयोगपतीचे नियंत्रण दुर करणे २. शेती, लघुउदयोग व निर्यात या क्षेत्रांना आवश्यक प्रमाणात कर्ज सुविधा मिळाव्यात. ३. बॅंक व्यवस्थापन अधिक व्यावसायिक दृष्टीकोनातून व्हावे. ४. नवीन उदयोजकांना सुलभ व सहज वित्तपुरवठा व्हावा व उत्तेजन मिळावे. ५. बॅंक कर्मचारी यांना आवश्यक अशा प्रशिक्षण सेवा सुविधा मिळाव्यात. यावरुन भारतात बॅंक व्यवसायाचा उगम फार वर्षापासून झालेला दिसून येतो. पूर्वी सावकार व सराफी पेढीवाले गरजु लोकांना कर्जपुरवठा करीत असत. यापैकी सावकार हे कर्ज देत असत सराफी आणि पेढीवाले मात्र कर्ज देण्याबरोबरच ठेवी स्विकारणे या प्रकारचे काम करत असत. त्यावेळी बॅंक व्यवसाय संघटित व कायदयान्वये नव्हता असे म्हणता येईल.

**राष्टीयकृत बॅंकाची प्रगती व कार्य**

शाखा विस्तार आणि लघुउदयोग सारख्या क्षेत्राला वाढत्या प्रमाणात भांडवल पुरवठा या राष्टीयकृत बॅंकाच्या जमेच्या बाजू आहेत. त्याशिवाय विकासाच्या दिशेने इतर बाबतीतही त्या प्रगतीपथावर आहेत.

भारतात राष्टीयकृत बॅंकेच्या शाखाचा विस्तार ज्या प्रमाणात झाला तेवढा शाखा विस्तार जगात कोठेही झालेला नाही. सन १९६९ मध्ये त्यांची संख्या १८०० तर सन १९९६ मध्ये ३४००० हजार झाली. ७५ टक्के शाखा खेड़यातुन उघडण्यात आल्या. शाखा विस्तार बरोबर प्रत्येक बॅंक कार्यालयामागे असलेली सरासरी लोकसंख्या ६५००० वरुन १४००० हजारापर्यंत करण्यात आहे.

राष्टीयकरणानंतर बॅंकाचा शाखा विस्तार

| वर्ष | बॅंक शाखा संख्या | ग्रामीण शाखा | एकुण शाखांशी ग्रामीण शाखांची टक्केवारी |
|---|---|---|---|
| १९६९ | ८२५० | १८६० | २२ |
| १९९० | ५८९०० | ३४०५० | ५८ |
| १९९६ | ६२८८० | ३४९२० | ५६ |

अशा प्रकारे शाखा विस्तार करण्यात आलेला आहे आणि या शाखा मधुन ग्रामीण भागात शेती व लघु उदयोगांना आर्थिक विकासासाठी वित्तपुरवठा करण्यात येत आहे.

मार्च २०११ अखेर व्यापारी बॅंकाच्या शाखा खालील प्रमाणे आहेत

व्यापारी बॅंकाच्या शाखा

| | बॅंकेचे नांव | शाखा | | |
|---|---|---|---|---|
| | | ग्रामीण | शहरी | एकुण |
| अ. | सार्वजनीक क्षेत्रातील बॅंका | २०३८७ | ४१८२४ | ६२२९१ |
| | राष्टीयकृत बॅंका २० | १४१८५ | ३०११३ | ४४२९८ |
| | स्टेट बॅंक समुह ६ | ६२०२ | ११७१२ | १७९१३ |
| ब. | खाजगी क्षेत्रातील बॅंका | १३११ | १०२९१ | ११६०२ |
| | जून्या खाजगी बॅंक १४ | ७६४ | ४०९३ | ४८१७ |
| | नवीन खाजगी बॅंक ७ | ५४७ | ६२३८ | ६७८५ |
| क. | परकीय बॅंका ३६ | ७ | ३१० | ३१७ |

वरील आर बी आय बुलेटीन डिसेंबर २०११ च्या सर्वे वरुन असे दिसून येते की, सार्वजनीक आणि खाजगी बॅंका यांनी ग्रामीण भागात शाखा उघडण्यास सुरुवात मोठया प्रमाणत केलेली दिसून येते. सन १९६९ नंतर मोठया प्रमाणात शाखा उघडण्यास सुरुवात केलेली आहे. सन १९६९ मध्ये ६५००० हजार लोकामागे एक बॅंक असे प्रमाण होते, ते सन २०१०—२०११ आणि २०११—२०१२ मध्ये १३४६६ इतके झाले आहे.

शाखा विस्तारा बरोबर आज सन २०१२—२०१३ च्या अर्थसंकल्पात केंद्रीय अर्थमंत्री यांनी महिला बॅंक स्थापनेसाठी १००० हजार कोटी रुपयाची तरतुद करण्यात आलेली आहे. यामुळेही आर्थिक विकासात महिला ही प्राधान्याने कार्य करतील अशी अपेक्षा आहे. शाखा विस्तारा बरोबरच ठेवी गोळा करणे व कर्ज पुरवठा करण्यावर भर दिलेला दिसून येतो व त्यामुळे आर्थिक विकासास गती देण्याचे काम बॅंका खंभीरपणे करत असल्याचा दिसून येतो.

**विकास कार्यात योगदान**

भारतीय राष्टीयकरणानंतर यासर्व बॅकेने नफा हे उदिदष्ट कमी करुन देशाच्या विकास कार्यक्रमात त्या आता सक्रियतेने सहभागी होत आहेत. अग्रणी बॅका योजनेप्रमाणे सर्व जिल्हयात अधिकोषाचा समतोल विकास घडवून आणण्यात त्या अग्रभागी राहिल्या आहेत. उत्पादनासाठी भांडवलाचा पुरवठा करुन सर्व क्षेत्रातील उत्पादकता वाढविण्यात अप्रत्यक्षपणे का होईना त्यांनी महत्वपुर्ण भूमिका बजावली आहे. ग्रामीण भागातील शेतमजुर, कारागीर, दारिद्ररेषेखालील महिला बचत गट यांना वित साहाय करुन रोजगार व दरडोई उत्पन्नाची पातळी वाढवण्याचे कार्य या बॅकेने उल्लेखनीय केल्याचे दिसून येत आहे.

१. प्राधान्य क्षेत्रांना साहाय
२. ठेवीच्या प्रमाणात वाढ
३. कर्जपुरवठा विस्तार
४. विकास योजनांचा वित्तसहाय

अशा प्रकारे विकास कार्यात या बॅकांचे महत्वपूर्ण योगदान दिसून येते. **बॅकाच्या कार्यातील त्रुटी** बॅका या आर्थिक विकासात महत्वपूर्ण भूमिका बजावत असल्यातरी पुढील प्रमाणे काही त्रुटी दिसून येतात.

**१. कर्मचारी संघटनांचा वाढता प्रभाव**

आज आपण पाहतो की बॅक कर्मचा—यांच्या संघटना अधिक प्रभावी झालेल्या असून राष्टीयकरणामुळे त्यांना बळ प्राप्त झाले आहे. वेळोवेळी संप, घेराव, अशा मार्गाचा अवलंब करुन अधिकोषण कार्यात अडथळा घालण्याचे काम केले जाते.

**२. राजकीय दबाव**

कर्मचा—यांची भरती, कर्ज मंजुरीची प्रक्रिया यामध्ये राजकारणाचा हस्तक्षेप होत असल्यामुळे अवाजवी राजकीय दबावांना तोंड दयावे लागत आहे यामुळे अकार्यक्षमता वाढत आहे. त्यामुळे राजकीय हस्तक्षेप धोरण कमी असावे.

**३. वाढती थकबाकी**

बॅकांनी गरीब शेतकरी, कारागीर, शेतमजूर अशा दुर्बल घटकांना बॅकानी मोठया प्रमाणात कर्जाउ पैसा पुरविलेला आहे, परंतु या कर्जाचे हप्ते वेळेवर भले जात नसल्यामुळे थकबाकीचे प्रमाण वाढत आहे. वस्तु:त बॅक कर्जाचा उपयोग करुन घेवून या दुर्बल घटकांनी स्वत:ची अर्थिक स्थिती सुधारावी, त्यांचे उत्पन्न वाढावे आणि उत्पन्नातुन हळूहळू कर्जफेड करावी अशी अपेक्षा करण्यास हरकत नाही, परंतु वित्त क्षेत्रातील ही शिस्त, नियोजन, नियम ते पाळत नाहीत त्यामुळे कर्जफेड वेळेत होत नाही त्यामुळे अधिकाधिक भांडवल थकबाकीमध्ये अडकते व विकासास अडचण निर्माण होत आहे.

**४. राष्टीयकरणामागची उदिदष्टे साध्य झाली नाहीत.**

बॅकाचे राष्टीयकरणाचे धोरण जे उद्दिष्ट घेवून केले होते ते अजुन पुर्णत्वाकडे नेले नाही. श्री आर के सिन्हा यांच्या नेतृत्वाखाली नियुक्त केलेल्या लोकसभेच्या अंदाज समितीने बॅकाच्या या कार्याबददल असमाधान व्यक्त केले आहे. राष्टीयकरणाची प्रमुख उदिदष्टे साध्य करण्यात या बॅकाना अपयश आले आहे. असा निष्कर्ष या समितीने काढला आहे. असमतोल दुर करण्याचा प्रयत्न केला आहे.

**बॅकींग क्षेत्रातील उपाययोजना**

अधिकोषण व्यवस्थेची कार्य पध्दती पाहण्यासाठी अभ्यास करण्यासाठी श्री नरसिहंम यांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय समिती गठीत करण्यात आली. या समितीने सन १९९१ मध्ये आपला अहवाल सरकारला सादर केला. त्यातील शिफारशी बॅकिंग क्षेत्रातील उपाययोजना किंवा सुधारणा पुढील प्रमाणे आहेत.

१. विशिष्ट प्रदेशांसाठी स्थानिक बॅका असाव्यात
२. संविधिक रोख निधीचे (SLR) सध्याचे प्रमाण जास्त आहेत कमी करावे.
३. विदेशी बॅकांना भारतात शाखा उघडण्याची परवानगी दयावी
४. प्रधान क्षेत्र तसेच एकात्मिक ग्रामिण विकास कार्यक्रम (IRDP) यांच्या कर्जावरील व्याजदरात दिल्या जाणा—या सवलतीचे प्रयोजन नाही अशा सवलतीची गरज नाही.
५. अधिकोषण क्षेत्रातील राजकीय हस्तक्षेप थांबवावा ही शिफारस करण्यात आली.
६. संविधिक रोख राखीव निधीची (CRR) टक्केवारी कमी करावी.
७. सार्वधिक रोख निधीचे प्रमाण ३८.५ वरुन २५ पर्यंत घटविले
८. मार्च १९९७ मध्ये संविधिक रोख राखीव निधीची टक्केवारीही १० पर्यंत कमी करण्यात आली
९. बुडीत कर्जाची व इतर नुकसान यांची १०० भरपाई करण्याकरीता तरतूद असली पाहिजे.
१०.भांडवल तरतुद आणि हिशोब योग्य दिल्यानंतर बॅकांना शाखाविस्तार व इतर निर्णय घेण्याचे स्वातंत्र असले पाहिजे.
११.खाजगी क्षेत्रातील बॅका सुरु करण्यासाठी परवानगी असली पाहिजे आणि बॅकाची कर्ज वसूली सुलभ व लवकर व्हावी म्हणून १९९३ मध्ये कर्जवुसली कायदा पास करण्यात आला.

बॅकाची सुधारणा करण्यासाठीची अंमलबजावणी बरोबरच लहान व स्थानिक निर्मिती करणे, बॅक कायदयाचे पुनर्विलोकन अशा सुधारणा होत असल्यामुळे बॅका बॅकिंग क्षेत्रात अत्याधुनिक पध्दतीने देणे शक्य होउ लागले आहे. यातुन एटीम ची सेवा तसेच टेलीबॅकिंग, इलेक्ट्रानिक फंडाटांन्स्फर, कोअर बॅकिंग, नेट बॅकिंग, क्रेडीट कार्डस, डेबीट कार्डस, स्मार्ट कार्डस इत्यादीचा समावेश बॅकिंग क्षेत्रात झाल्यामुळे अर्थिक विकासात भर पडत आहे. केंद्रिय अर्थसंकल्प २०१२—२०१३ मध्ये प्रत्येक सार्वजनीक क्षेत्रातील बॅकेच्या ठिकाणी शाखा स्थापन कर.ण्याचे ठरविलेले आहे. बॅक सेवांच्या उपलब्धतेच्या बाबतीत असलेली प्रादेशिक विषमता कमी करण्यावर भर दिला जात आहे. बचत गटांना वित्तपुरवठा करण्याचे सहाय्य होत आहे. याच अर्थसंकल्पात आणखी एक पाउल म्हणजे महिला बॅकाची स्थापना करण्यात आलेली आहे.

**सारांश**

देशाच्या आर्थिक विकासात बॅकिंग क्षेत्र हे अत्यंत महत्वपुर्ण भूमिका बजावत असले तरी देशात अर्थव्यवस्था मंदीतुन वाटचाल करत आहे. सतत वाढणा—या तेल व डिझेल किमंती याचा परिणाम देशातील तेल कंपन्यावर होत असल्यामुळे महागाई वाढत आहे. यावर आर. बी. आय. ने पण लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे. बॅकिंग क्षेत्रात संगणक, माहिती तंत्रज्ञान व इतर आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला गेल्यामुळे वित्तीय सेवा जलदगतीने होउ लागल्या आहे. देशात आणि परदेशी संस्थामध्ये वित्तीय सेवा पुरविण्याच्या स्पर्धा वाढलेली दिसून येत आहे. देशाच्या अर्थव्यवस्था विकसीत करण्यासाठी बॅकिंग क्षेत्र अविभाज्य घटक बनलेल्या आहे. उत्पन्न, उपभोग खर्च, बचत— भांडवल गुंतवणुक आणि परत उत्पन्न ही प्रक्रिया चालू राहते म्हणून बचत भांडवल गुंतवणुक आणि परत उत्पन्न ही प्रक्रीय चालू राहते म्हणून बॅकिंग क्षेत्र देशाच्या विकासात महत्वाची भूमिका पार पाडत असतांना दिसून येतात.

संदर्भ सुची —


| | | |
|---|---|---|
| १. पैसा आणि वित्तीय रचना | — | डॉ. सी. जे. जोशी, ए. सी. जोशी |
| २. Indian Economy | — | Datta & Sundhanam |
| ३. भारतीय अर्थव्यवस्था | — | प्रा. प्र. रा. कुलकर्णी |
| ४. International Journal of Management of Economics | — | March - 2016 |
| ५. Economics Survey of India | — | 2009-10, 2010-11 |
| ६. भारतीय अर्थव्यवस्था | — | रंजन कोळंबे |
| ७. अर्थसंवाद | — | एप्रिल—जुन २०१२ |
| ८. RBI Monthly Bulletin | — | Dec. 2016 |